

## ॥ घोरकष्टोद्धरण स्तोत्र ॥

‘घोरकष्टोद्धरणस्तोत्र’ या नावामध्येच या स्तोत्राचे उद्दिष्ट स्पष्ट होते. भयंकर कष्टप्रद अवस्थेतून मुक्तता ! माझ्या हातून योग्य धर्माचरण व्हावे, सद्बुद्धी आणि विवेक जागृत व्हावा व भगवंताबद्दल पूज्य भाव प्राप्त व्हावा यासाठी हे प्रभो, सर्व प्रकारच्या सांसारिक कष्टातून, तू मला सोडव, माझा उद्धार कर अशी कळकळीची प्रार्थना या पाच श्लोकांच्या स्तोत्रातून केलेली आहे. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती यांनी रचलेले हे अत्यंत रसाळ स्तोत्र समजण्यास सोपे आहे.

**श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव**
**श्री दत्तास्मान् पाहि देवाधीदेव ।**
**भावग्राह्य क्लेशहारिन् सुकीर्ते**
**घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ १**

**मराठी- हे श्रीपाद श्रीवल्लभा, देवांच्या देवा, (भक्तांचे) कष्ट नष्ट करण्यासाठी प्रसिद्ध श्रीदत्ता, आमच्या मनीचे भाव जाणून आमचे क्लेश हरण कर. संसारातील भयंकर त्रासापासून तू आमची सुटका कर. तुला आमचा नमस्कार.**

**श्रीपाद कीर्ती तव, क्लेश-हर्ता**
**भक्ता मनी जे, समजून घेता ।**
**माझ्या व्यथा तू हर दत्तस्वामी**
**क्लेशातुनी वाचव, वंदितो मी ॥ १**

**त्वं नो माता त्वं पिताप्तोऽधिपस्त्वं**
**त्रातायोगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वम् ।**
**त्वं सर्वस्वं नो प्रभो विश्वमूर्ते**
**घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ २**

**मराठी- तू आमची माय आहेस. तू आमचा बाप आहेस. तू आमचा नातलग आहेस. तू आमचा राजा आहेस. आमचा रक्षणकर्ता आणि कल्याण करणारा सद्गुरूही तूच आहेस. हे सर्व विश्व व्यापणाऱ्या परमेश्वरा, तू आमचे सर्वस्व आहेस. संसारातील भयंकर त्रासापासून तू आमची सुटका कर. तुला आमचा नमस्कार.**

तू माय राजा नि सखा पिता तू
कल्याणकारी गुरु, रक्षिसी तू ।
सर्वस्व आम्हां, जग व्यापि स्वामी
क्लेशातुनी वाचव, वंदितो मी ॥ २

पापं तापं व्याधीमाधींच दैन्यम्
भीतिं क्लेशं त्वं हराशु त्वदन्यम् |
त्रातारं नो वीक्ष्य ईशास्तजूर्ते
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते || ३

मराठी- तू त्वरेने आमचे पातक, त्रास, आजार, मानसिक व्यथा, दारिद्र्य, भय, क्लेश दूर कर. आमचा ताप नष्ट करणाऱ्या हे ईश्वरा, तुझ्या खेरीज आमचे रक्षण करणारा कोणीच दिसत नाही. संसारातील भयंकर त्रासापासून तू आमची सुटका कर. तुला आमचा नमस्कार.

तू तातडीने हर पातकांना
आजार व्याधी डर क्लेश नाना ।
तापा हरायास दिसे दुजा ना
वंदू तुला, क्लेशनाशा करी ना ॥ ३

नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता
त्वत्तो देव त्वं शरण्योऽकहर्ता |
कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते || ४

मराठी- तुझ्या खेरीज वेगळा असा आमचा दुसरा राखणदार नाही. ना कोणी (आम्हाला) दान देणारा (दानशूर) ! ना कोणी पालक ! शरण आलेल्यांवर कृपा करणारा तुझ्या खेरीज कोणी नाही. आमची संकटे हरण करणारा नाही. संपूर्ण (मुक्तहस्ताने) दान देणाऱ्या अत्रिसुता, संसारातील भयंकर त्रासापासून तू आमची सुटका कर. तुला आमचा नमस्कार.

पाळी न राखी न दुजा न दानी
थारा न धोका टळण्यास कोणी ।
अत्रीसुता पूर्ण उदार स्वामी
क्लेशातुनी वाचव, वंदितो मी ॥ ४

धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिम्
सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् ।
भावासक्तिं चाखिलानन्दमूर्ते
घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥ ५

**मराठी- ज्याचे ठायी सर्व आनंद मूर्त स्वरूपात आहेत अशा (श्री दत्ता), तू आमच्या ठिकाणी धर्माच्या बाबतीत प्रेम, चांगली बुद्धी, देवाची भक्ती, सज्जनांची संगत, भरभराट, उपभोग, मोक्ष, व भावनापूर्ण प्रेम दे. संसारातील भयंकर त्रासापासून तू आमची सुटका कर. तुला आमचा नमस्कार.**

**धर्मासाठी प्रेम दे, देवभक्ती**
**सद्बुद्धि, सत्संग, ऐश्वर्य, मुक्ती ।**
**दत्तस्वामी प्रेम दे भावनांना**
**तुम्हा वंदितो क्लेशनाशा करा ना ॥ ५**

श्लोकपंचकमेतद् यो लोकमंगलवर्धनम् ।
प्रपठेन्नियतो भक्त्या स श्रीदत्तप्रियो भवेत् ॥

**मराठी- सर्वसामान्य जनांचे कल्याण करणारे हे पाच श्लोक जो नित्य नियमाने भक्तिपूर्वक म्हणेल, तो श्री दत्ताला आवडता होईल.**

**जनसामान्य-कल्याणी पाच हे श्लोक नेहमी ।**
**भक्तिने जो म्हणे होई दत्ता प्रिय ना कमी ॥**

॥ इति श्रीवासुदेवानन्दसरस्वतीविरचितं घोरकष्टोद्धरण स्तोत्रम् सम्पूर्णम् ॥

********************

धनंजय बोरकर (९८३३०७७०९१)